पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

**प्रेसनोट** दिनांक : १४/०८/२०२३

**होमगार्डस् मधील मालेगाव पथकाचे समादेशक अधिकारी श्री.अय्युबखान अहमदखान पठाण यांना राष्ट्रपती पदक घोषित**

---

नाशिक जिल्हा होमगार्डस् मधील मालेगाव पथकाचे समादेशक अधिकारी श्री.अय्युबखान अहमदखान पठाण, स.क्र.१५९६८ कंपनी नायक यांना १५ ऑगस्ट २०२३ स्वातंत्र्यदिना निमित्त होमगार्ड व नागरी संरक्षण दलात विशेष व उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल मा. महामहिम राष्ट्रपतींचे पदक घोषित झाले आहे.

श्री. अय्युबखान अहमदखान पठाण हे १९९२ सालापासून होमगार्ड संघटनेत कार्यरत असुन त्यांनी या संघटनेत दिलेल्या दिर्घ सेवेचे दिलेले योगदान व संघटनेच्या माध्यमातुन सामाजिक, राष्ट्रीय कार्य केलेली आहेत. या विशेष व उल्लेखनीय केलेल्य कामाचे मुल्यांकन होऊन त्यांचा मा.डॉ.श्री. भुषण कुमार उपाध्याय महासमादेशक व मा. प्रभातकुमार, उपमहासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दखल घेऊन त्यांचा उचित सन्मान होण्याच्या दृष्टीने व होमगार्डस्ना प्रेरीत करण्याकरीता प्रस्ताव सादर केलेला होता.

श्री. अय्युबखान अहमदखान पठाण यांना १५ ऑगस्ट २०२३ स्वातंत्र्यदिना निमित्त होमगार्ड व नागरी संरक्षण दलाचे मा. ना. महामहिम राष्ट्रपतींचे पदक घोषित झाल्याबद्दल त्यांचे मा. डॉ. श्री. भुषण कुमार उपाध्याय, महासमादेशक व मा. प्रभातकुमार, उपमहासमादेशक होमगार्ड महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी तसेच पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. शहाजी उमाप, अपर पोलीस अधीक्षक तथा जिल्हा होमगार्ड समादेशक नाशिक श्रीमती माधुरी केदार-कांगणे, व जिल्हयातील सर्व होमगार्डस्चे समादेशक अधिकारी, सर्व मानसेवी अधिकारी सर्व पुरुष व महिला होमगार्डस् जिल्हा होमगार्ड कार्यालयाचे कर्मचारी वृंद यांनी तसेच नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे अभिनंदन केले आहे.